# लातूर शहर महानगरपालिका लातूर

मा.आयुक्त यांचे कार्यालय (आरोग्य विभाग)
फोन- 02382 242803, 256899 फॅक्स- 02382-246074
वेबसाईट- www.mclatur.org email:moh.mclatur1@gmail.com


जाक्र/लाशमनपाला/आरोग्य विभाग/ 6289 /२०२४-२५ दिनांक १८/०९/२०२४

## गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम

## 1994 सुधारित 2003 सदर अधिनियम कलम 18(2)

## महानगरपालिका सल्लागार समिती (PCPNDT)

# जाहीर प्रगटन

लातूर शहरातील सर्व सोनोग्राफी सेंटर व एमटीपी सेंटर चे सनियंत्रण जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालयामार्फत करण्यात येत होते. तथापि शहरातील सर्व सोनोग्राफी व एमटीपी सेंटरचे सर्व रेकॉर्ड महानगरपालिका आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले असुन यापुढे सोनोग्राफी सेंटर व एमटीपी सेंटर चे सनियंत्रण महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत करण्यात येणार आहे.

गर्भधारणापूर्व व प्रसुतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ च्या कलम १७(५) मध्ये नमुद केल्यानुसार महानगरपालिका स्तरावर गठीत करावयाच्या सल्लागार समितीची ८ सदस्य संख्या असलेला सल्लागार समिती स्थापन करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे. तरी ८ सदस्यांपैकी दोन पदे पदसिध्द सदस्य आहे. इतर खालील इतर सदस्यांच्या ६ पदासाठी निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या सदस्यांकरिता कसल्याही प्रकारचे मानधन देय राहणार नाही.याची नोंद घ्यावी.

१. स्त्री रोग चिकीत्सक,
२. बालरोग तज्ञ
३. वैद्यकीय अनुवंशशास्त्र तज्ञ
४. तीन (०३) प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते,त्यापैकी एक महिला संघटनांच्या प्रतिनिधीपैकी असले पाहिजे.

तरी इच्छुक असलेल्या तज्ञ व सामाजीक कार्यकर्ता यांनी आपले अनुभव प्रमाणपत्र व केलेल्या कामकाजा संबंधीची कागदपत्रे lcmc.moh@gmail.com किंवा नागरी सुविधा केंद्र लातूर शहर महानगरपालिका, लातूर येथे सादर करावी.

18/09/2024.
वैद्यकीय आरोग्य अधिकारी (गट-अ),
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर
१. मा.आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर
२. मा.उपायुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर

कार्यवाहीस्तवः-
ई-प्रशासन विभाग प्रमुख, लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with CamScanner